# Maharashtra Rajya Sahakari Dudh Mahasangh Maryadit
# Mahanand Dairy

**Western Express Highway,Goregaon (E),Mumbai - 400065**

E-TENDER NOTICE-018

Tender notice No.MND/7.2/MKT/Megadist./018/2021 Date 09.04.2021 on the behalf of Maharashtra Rajya Sahakari Dudh Mahasangh Maryadit, Mahanand Dairy,Goregaon, the undersingned invites online e-tenderers for the appointment of Mega Distributor cum Transporter for the following work.

| Sr.No | Particulars of work | EMD (Rs) | Tender fee (Rs) | Validity (days) |
|---|---|---|---|---|
| 1 | Sale of milk products in brand name "Aarey" from Mega Distributor cum Transporter for a period of 3 years on **Royalty basis in Mumbai and rest of Maharashtra** | 25,00,000/- | 10,000/- | 120 |

1. Complete bidding process will be online (e-tendering) in two envelope system. All the notifications and detail terms and conditions regarding this tender notice here after will be published online on website http://mahatenders.gov.in

2. Bidding documents can be seen, downloaded and submitted from the website http://mahatenders.gov.in from date : 09/04/2021 at 15.00 hrs to date :20/04/2021 at 13.00 hrs

3. Required amount of tender fee and EMD shall be paid in the form of DD in the name of MRSDMM.

4. Technical bids will be opened online on date: 22/04/2021 at 15.00hrs at the Mahanand Dairy, W. Express Highway, Goregaon (E), Mumbai – 400065.

5. Tenderer should upload information and scanned copies in pdf format in technical envelope as mentioned in technical offer and same should be submitted in original for verification at the time of technical bid opening .

6. Tenderer should upload rate as he desires in Commercial Envelope.

7. Time and date of opening of financial bids will be informed to the qualified bidder.

8. The Managing Director, Maharashtra Rajya Sahakari Dudh Mahasangh Maryadit, Mahanand Dairy, Goregaon reserves the right to accept or reject any or all the tenderers without assigning any reason.

9. Guidelines to download the tender documents and online submission of bids can be downloaded from the website http://mahatenders.gov.in , contact number 9619662353 .

Shyamsundar Patil I.A.S.
MRSDMM, Mahanand Dairy
Goregaon(E),Mumbai-65

## :आरे ब्रॅन्ड अंतर्गत दुग्धपदार्थांची रॉयल्टी तत्वावर विक्री ई-निविदा:

बृहन्मुंबई दूध योजना व राज्यातील शासकीय दूध योजनांमार्फत दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री कायम ठेवून शासनाच्या पॅकिंगपेक्षा भिन्न पॅकिंगमध्ये महानंदद्वारा उत्पादीत आरे ब्रॅन्डखाली दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करुन रॉयल्टी तत्वावर त्याची विक्री करण्याकरीता निविदा मागविणे.

दुग्धव्यवसाय विकास विभागाकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी पुढील तीन वर्षासाठी रॉयल्टी तत्वावर महानंदद्वारा उत्पादीत आरे ब्रॅन्ड अंतर्गत दुग्धजन्य पदार्थ उत्पादन करुन मुंबई तसेच महाराष्ट्र राज्यात विक्री करण्याकरीता विक्रेते / वितरक यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. यासाठी खालीलप्रमाणे अटी शर्ती आहेत.

---

## ई - निविदेतील अटी व शर्ती

प्रत्येक इच्छुक निविदाकाराने खाली नमुद केल्याप्रमाणे निविदा अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे दोन लिफाफा पध्दतीनूसार विहित केलेल्या नमुन्यातच http://mahatenders.gov.in

या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक राहील.

.......................................................................................................

### (अ) तांत्रिक लिफाफा

१) आवश्यक बयाणा रक्कम (EMD) रु.२५ लक्ष (अक्षरी रु.पंचवीस लाख फक्त.) भरणे आवश्यक राहील.यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.
२) निविदा संचाची किंमत रु.१०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) कर अतिरिक्त भरणे आवश्यक राहील व ही किंमत ना परतावा स्वरुपाची राहील.
३) एफ एस एस ए आय (FSSAI )प्रमाणपत्र .
४) संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
५) दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्याचा अनुभव स्वयंघोषित करणे.
६) दुग्धजन्य पदार्थ विक्री / वितरणाची किमान पाच वर्ष अनुभव पुराव्याची कागदपत्रे अथवा स्वत: व्यवसाय करत असल्याचे प्रमाणपत्र तसेच दुग्धजन्य पदार्थ वितरण साखळीमध्ये विक्री केल्याचा किमान तीन वर्षाचा (सन २०१४-१५ते२०१८-१९ ) अनुभव असावा.
७) निविदाकाराची या पूर्वीच्या पाच वर्षाची वार्षिक सरासरी उलाढाल किमान रु. १४ कोटी असणे आवश्यक आहे, त्याकरीता सनदी लेखापालाने स्वाक्षांकीत केलेले वार्षिक सरासरी उलाढालीचे प्रमाणपत्र यासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
८) निविदाकाराची दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी पुरवठा करणारी स्वत:ची किंवा भाड्याची किमान दहा इन्सुलेटेड वाहने आर.टी.ओ.यांनी प्रमाणित केलेल्या मानकांनूसार असणे आवश्यक आहे. त्याबाबतची कागदपत्रे या सोबत सादर करणे बंधंनकारक राहील.
९) माहे नोव्हेंबर २०२० अखेर पर्यंतचे जीएसटी परतावा प्रमाण पत्र सादर करणे.
१०) निविदाकार यांनी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे.

.......................................................................................................

## (ब) व्यापारी लिफाफा

दुस-या लिफाफ्यामध्ये वार्षिक रॉयल्टीची रक्कम विहीत नमुन्यात नमुद करुन http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावी.

| निविदाकाराचे / फर्मचे नाव | वार्षिक रॉयल्टी रक्कम रुपये<br>(किमान निर्धारीत वार्षिक रॉयल्टी रक्कम रु.७५लाखापेक्षा जास्त.) |
|---|---|
| | |

### -: सर्वसाधारण अटी :-

१) ठेक्याचा तीन वर्षाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर शासनाने दूध महासंघास मुदत वाढ दिल्यास दूध महासंघ ठेकेदाराचा मागील कामाचा आढावा घेऊन करारनामा नुतनीकरण करण्यात येईल.

२) निविदाकार हे अन्न सुरक्षा व मानदे कायद्या अंतर्गत नोंदणीकृत व परवाना धारक दुग्धजन्य पदार्थ / खाद्यपदार्थ वितरक किंवा विक्रेता असावा.

३) प्रत्येक इच्छुक निविदाकाराने नमूद केल्याप्रमाणे निविदा अर्ज व त्या सोबतची आवश्यक ती कागदपत्रे दोन लिफाफा पध्दतीनूसार विहीत केलेल्या नमून्यातच http://mahatenders.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर ऑन लाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक राहील.

४) निविदाकार भागीदारी स्वरुपात असल्यास कायद्यानूसार नोंदणी करारपत्र व व्यवहार करण्याबाबतचे अधिकार पत्र ( पॉवर ऑफ ॲटर्नी ) सादर करणे.

५) फर्म असल्यास व्यवहार करण्याबाबतचे अधिकार पत्र ( पॉवर ऑफ ॲटर्नी ) तसेच या निविदेसाठी कंपनीतर्फे स्वाक्षरी / व्यवहार करणाऱ्या अधिकाराचे प्रमाणपत्र.

६) निविदा अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र ( Declaration letter ).

७) निविदाकाराकडे कोणत्याही प्रकारची शासकीय थकबाकी नसल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष केलेले प्रतिज्ञापत्र.

८) निविदाकारावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष केलेले प्रतिज्ञापत्र.

९)निविदाकारास कोणत्याही शासकीय विभागामार्फत काळ्या यादीत टाकले नाही याबाबतचे स्वघोषणापत्र निविदाकाराने सादर करावे.

१०) सोबत जोडलेले सर्व प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या सत्यतेबाबत व देण्यात येणारी माहिती ही खरी असल्याचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

११) दूध व दुग्धपदार्थ यांची गुणवत्ता तत्संबंधीच्या निर्धारीत मानकांप्रमाणे राखणे निविदाकारास बंधंनकारक राहील.

१२) सर्व प्रथम तांत्रिक लिफाफा उघडला जाईल. त्यामध्ये आवश्यक कागदपत्रे ,ईएमडी व निविदा संचाच्या किंमतीच्या रक्कमेची पुर्तता झालेचे आढळल्यानंतर निविदा वैध ठरवून पुढील प्रक्रिया सुरु करण्यात येईल. जर तांत्रिक लिफाफा उघडताना तांत्रिक बाबी अपूर्ण आढळल्यास संबंधित निविदाकाराची निविदा अवैध ठरविण्यात येईल. तांत्रिक लिफाफा मधील माहिती परिपूर्ण आढळून आल्यानंतरच व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

१३) तांत्रिक निविदा उघडतेवेळी जो निविदाकार तांत्रिक निकषांची पूर्तता करेल तोच निविदाकार व्यापारी निविदा उघडण्यास पात्र ठरेल.

१४) निविदाकाराने निविदेतील तसेच करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास ती निविदा व ठेका रद्द करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादीत, गोरेगाव मुंबई ४०००६५ यांना राहतील.

१५) विक्रीच्या अथवा करारनाम्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास निविदाकारास फक्त मुंबई न्यायालयात दाद मागता येईल.

१६) यशस्वी निविदाकारास ठेका दिल्यास त्यांनी स्वत: ठेका चालविणे बंधनकारक राहील. सदर ठेका हस्तांतरीत करता येणार नाही.

१७) प्रस्तूत निविदाकाराची नेमणूक ही करारनामा केल्यापासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी राहील. त्यानंतर पुढील मुदत वाढ दूध महासंघाच्या मान्यतेने जास्तीत जास्त तीन महिन्याकरीता देण्यात येईल. ठेक्याच्या वाढीव कालावधीसाठी करारनाम्याच्या मुळ अटी-शर्ती कायम राहतील.

१८) दूध महासंघाने सदर करारनाम्या संदर्भात किमान निर्धारीत वार्षिक रॉयल्टी रक्कम रु.७५ लाख (अक्षरी रु. पंचाहत्तर लाख फक्त ) ठरविली आहे. सदर निर्धारीत वार्षिक रॉयल्टीपेक्षा जो निविदाकार जास्त रक्कम दूध महासंघास देईल, त्याची वितरक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. तद्‌नंतर पुढील कालावधीकरीता वार्षिक १० % वाढ करण्यात येईल.

१९) यशस्वी निविदाकाराच्या महानंद स्टॉलच्या ठिकाणास / साठवणूकीच्या ठिकाणास आवश्यकतेनूसार दूध महासंघाचे अधिकारी/ कर्मचारी यांना भेट देऊन तपासणी करण्याचा अधिकार राहील.

२०) शासनाचे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व प्रकाराचे कर निविदाकाराने भरणा करणे बंधनकारक राहील.

२१) निविदेस पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही तर निविदेस मुदत वाढ देण्याचा किंवा फेर निविदा मागविण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादीत ,गोरेगाव मुंबई ४०००६५ यांना राहील.

२२) यशस्वी निविदाकराने किमान वार्षिक १५०० मे.टन दुग्धपदार्थ विक्री करणे बंधनकारक राहील. त्याचे वितरक दराप्रमाणे विक्रीमुल्य रु.१५ कोटींपेक्षा जास्त असावे. तसे न झाल्यास ठेका रद्द करुन अट क्रं. २५ नूसार कारवाई करण्यात येईलयशस्वी निविदाकराने किमान वार्षिक १५०० मे.टन दुग्धपदार्थ विक्री करणे बंधनकारक राहील. त्याचे वितरक दराप्रमाणे विक्रीमुल्य रु.१५ कोटींपेक्षा जास्त असावे. तसे न झाल्यास ठेका रद्द करुन अट क्रं. २५ नूसार कारवाई करण्याचे अधिकार दूध महासंघास राहील.

२३) यशस्वी निविदाकाराने तीन वर्ष मुदतीची सुरक्षा अनामत रक्कम रु.१ कोटी ( अक्षरी रु.एक कोटी फक्त.) राष्ट्रीयीकृत बँक गॅरंटीच्या स्वरुपात दूध महासंघास करारनामा करण्यापूर्वी जमा करणे बंधनकारक राहील.

२४) यशस्वी निविदाकाराने एकदा रॉयल्टी म्हणून भरलेली रक्कम निविदाकारास कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

२५) यशस्वी निविदाकाराने ठेका मुदतीपूर्वी सोडल्यास किंवा अट क्र.२२ प्रमाणे रद्द केल्यास व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित,गोरेगाव मुंबई ४०००६५ यांचेमार्फत सदर ठेका निविदेतील एच.क्र.२ च्या निविदाकारास देण्यात येतील. जर क्र.२ निविदाकार सदर ठेका स्विकारण्यास तयार झाला नाही तर उर्वरीत कालावधीत दूध महासंघास प्राप्त होणारी रक्कम

(तीन वर्षाकरीता,ठेका कालवधी) संबधित यशस्वी ठेकेदाराकडून बँक गॅरंटी अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

२६) निविदाकार यांना ठेका मिळाल्यानंतर स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. सदर करारनामा नोंदणीकृत करावा लागेल. त्याचा खर्च निविदाकाराने करावयाचा आहे.

२७) यशस्वी निविदाकार आरे दुग्धशाळेने दिलेल्या सुचितील दुग्धपदार्थ उत्पादीत करणारा नसावा.

२८)यशस्वी निविदाकाराने दूध महासंघास रॉयल्टी रक्कम आगावू अदा करावयाची आहे .

२९) यशस्वी निविदाकाराने दैनंदिन दुग्धपदार्थ उचल (खरेदी )रक्कम आगावू भरणे आवश्यक आहे. व दूध व दुग्धपदार्थ उचल महानंद दुग्धशाळा ,गोरेगाव मुंबई ४०००६५ येथून करावी लागणार आहे.

३०) यशस्वी निविदाकाराने दूध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री / वितरण करण्यासाठी महानंद दुग्धशाळेच्या प्रचलित पध्दतीनुसार एक्स डेअरी व एम.पी.डी. वितरकांप्रमाणे अनामत रक्कम भरणा करणे बंधंनकारक राहिल.

३१) निविदापूर्व बैठक आयोजित करण्यात येईल तसेच तांत्रिक निविदा उघडतेवेळी निविदाकारांकडुन सादरीकरण करावयाचे आहे.

३२) एक किंवा अधिक मेगा वितरक -वाहतूक ठेकेदारांची नियुक्ती करण्याचा अधिकार दूध महासंघास राहील.

३३) यशस्वी निविदाकाराशी झालेल्या करारनाम्यानंतर अटी व शर्तीमध्ये किंवा निविदेच्या अनुषंगाने दूध महासंघाने काही बदल व सुधारणा केल्यास अशा सुधारीत बाबी निविदाकारास लागू राहतील व बंधंनकारक राहतील.

व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित,मुंबई
महानंद दुग्धशाळा.